नौपाडा वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ५५ /२०२६ दि. २३ /०३/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, नौपाडा वाहतूक उपविभागाचे हद्दीत कोपीनेश्वर सांस्कृतीक न्यास, ठाणे यांचे वतीने **दि. १५/०३/२०२६ रोजी सायंकाळी ०६.३० वा. ते ०९.३० वा. पावेतो कचराळी तलाव, ठाणे महानगर पालीकेच्या समोर गोदा आरतीचे आयोजन** करण्यात आलेले आहे. सदर ठिकाणी आरतीकरीता ५००० ते ६००० भाविक सहभागी होणार आहेत. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे:—

प्रवेश बंद –	१) टि.एम.सी. सर्कलकडुन कडून डॉ. अरुणकुमार वैद्य मार्गाने परमार्थ निकेतन चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **टि.एम.सी. सर्कल** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने ही सरळ नितीन जंक्शन किंवा अल्मेडा सिग्नल मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	२) परमार्थ निकेतन चौक कडून डॉ. अरुणकुमार वैद्य मार्गाने टि.एम.सी. सर्कलकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **परमार्थ निकेतन चौक** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने ही सतरंज वेफर्स समोरुन डावे किंवा उजवे वळण घेवुन आराधना चौक किंवा नाशिक मुंबई सर्व्हीस रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.
नो पार्कींग –	**टि.एम.सी. सर्कल ते परमार्थ निकेतन चौक** रस्त्याच्या दोन्ही बाजुस वाहने **पार्किंग** करण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदर अधिसूचना दिनांक १५/०३/२०२६ रोजी सकाळी १०:०० वा. ते रात्रौ २३:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.
२/— सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर :—

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५, वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :—

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व सर्व संबधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.

२/– म.न.पा.ठाणे च्या सबधीत अधिकाऱ्याकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.